पोलिसांनी केला करेक्ट कार्यक्रम

# तीन आरोपींना अटक; पिस्तूल, काडतूस जप्त



नांदेड, दि. ८: शहरात काही दिवसांपूर्वी झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर पोलीस सतर्क झाले असून शहरात विविध ठिकाणी ऑलआउट ऑपरेशन राबवण्यात येत आहे. वजिराबाद ठाण्याच्या पोलिसांनी शनिवारी तीन सराईत गुन्हेगारांना अटक करुन चार पिस्तूल आणि ३० जिवंत काडतूस जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेले काडतूस आणि पिस्तूल मध्यप्रदेशातून खरेदी केल्याचे तपासात स्पष्ट झालं आहे.

दोन दिवसांपूर्वी वजिराबादच्या डीबी पथकाने गोवर्धनघाट परिसरात एका आरोपीकडून पिस्तूल जप्त केले होते. तपासादरम्यान सिडको येथील भोलासिंग उर्फ हरजितसिंघ उर्फ पोलो चरणसिंघ बावरी याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस भोलासिंगवर पाळत ठेवत होते. तो हिंगोलीगेट परिसरात पिस्तूल विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले. अंग झडती घेतल्यानंतर त्याच्याकडे एक पिस्तूल आणि ७ जिवंत काडतूस आढळून आले. त्याची चौकशी केली असता त्याने तीन पिस्तूल आणि काडतूस विक्री केल्याची माहिती समोर आली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी महम्मद तौफिक शेख सनदलजी याच्याकडून एक

<< पान दोनवर

## ३ महिन्यांत १७ पिस्तूल जप्त

शहरात गेल्या वर्षभरात अवैधरित्या गावठी कट्टे वापरुन गोळीबाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. मागील वर्षी नांदेड पोलिसांनी आरोपीकडून ३९ पिस्तूल जप्त केले होते. या वर्षात म्हणजेच साडेतीन महिन्यात १७ पिस्तूल आरोपीकडून जप्त करण्यात आले आहेत.

9/10/23

पान ३ वरून

## शहरात क्राईमसाठी ...

यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी रिव्हॉल्वर जप्त करण्यात आले. यानंतर महम्मद तौफिक (गल्ली नं. २४, लक्ष्मीनगर, जुलेखा मस्जिद जवळ) याला अटक करुन त्याच्या जवळील गावठी पिस्टल मॅग्झीनसह २३ जीवंत काडतूस, एक रिकामी मॅग्झीन जप्त करण्यात आली. भोलासिंघ बावरी हा मध्यप्रदेशातून स्वस्तात गावठी पिस्टल खरेदी करुन नांदेड शहर व ग्रामीण भागात विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी तीन्ही आरोपींकडून चार जावठी पिस्टल, तीस जीवंत काडतुसे, एक मॅग्झीन, एक दुचाकी, असा एक लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अविनाशकुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, गुन्हे शोध पथकाचे अधिकारी शिवराज जमदाडे यांच्यासह पोलीस कर्मचारी दत्तराम जाधव, शरदचंद्र चावडे, मनोज परदेशी, विजयकुमार, शेख इमान शेख एजाज, बालाजी कदम, रमेश सूर्यवंशी, व्यंकट गंगुलवार, भाऊसाहेब राठोड, अरुण साखरे आदींनी केली.